महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात आस्थापनेवरील खर्चाच्या बाबींकरिता अनिवार्य मंजूर तरतूदीतून खर्चासाठी प्रशासकीय मान्यता .

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : उसाअ-२०१९/प्र.क्र.६/उसाअ/का-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ११.०६.२०१९

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : इयुए-१०७५/एलजेजे, दि.१६.४.१९७५

२) अल्पसंख्याक विकास विभाग , शासन निर्णय क्रमांक : उसाअ-२०१६/प्र.क्र.६(सुधा-१)/ का-४, दि.५.१०.२०१६

३) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग,क्रमांक : : अविवि-२०१९/प्र.क्र.१४/का-७ दि.९.४.२०१९

प्रस्तावना :-

राज्यात उर्दू भाषेचा विकास, संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारिक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्् अकादमीची स्थापना संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात होणा-या आस्थापनेवरील खर्चाच्या बाबीकरिता रु.२०,००,०००/-(अक्षरी रुपये वीस लाख फक्त) इतकी अनिवार्य तरतूद मंजूर करण्यात आलेली असून विभागाच्या संदर्भ क्र.३ दि.९.४.२०१९ च्या परिपत्रकानुसार एप्रिल ते जुलै,२०१९ या ४ महिन्याकरिता मंजूर तरतूदीच्या रु.६,७०,०००/-(अक्षरी रूपये सहा लाख सत्तर हजार फक्त्) इतका निधी खर्च करण्यास उपलब्ध आहे. उर्दू अकादमीमार्फत कार्यालयीन खर्च, अशासकीय सदस्यांचे प्रवास व दैनिक भत्ते कार्याध्यक्ष यांचे मानधन,बैठकीसाठी अल्पपोहार इत्यादी कामकाजासाठी मंजूर तरतूदीनुसार एप्रिल ते जुलै,२०१९ या ४ महिन्याच्या कालावधीसाठी रु.६.७०.०००/- निधीची आवश्यकता आहे. सबब, सदर उपलब्ध निधीतून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या आस्थापनेवरील खर्चाच्या बाबीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "मागणी क्र. झेडई १,२२०५ कला व संस्कृती, १०२-कला व संस्कृती प्रचालन (००) (०१) उर्दू अकादमीची आस्थापना/दत्तमत, ३१ सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२२०५ ३०२७)" या लेखाशिर्षाखाली रु.२०,००,०००/-(अक्षरी रुपये वीस लाख फक्त) इतक्या अर्थसंकल्पित तरतूदीतून विभागाच्या संदर्भ क्र.३ दि.९.४.२०१९ च्या परिपत्रकानुसार माहे एप्रिल ते जुलै,२०१९ या ४ महिन्याकरिता रु.६,७०,०००/-(अक्षरी रूपये सहा लाख सत्तर हजार फक्त) इतक्या निधीतून अकादमीने प्रस्तावित केल्यानूसार पुढीलप्रमाणे खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	उद्दीष्टये	सन २०१-१९ या वर्षाकरिता एप्रिल ते जुलै,२०१९ या ४ महिन्यांकरिता प्रस्तावित रक्कम (रुपये)
१.	कार्यालयीन खर्च	१,००,०००/-
२.	कार्याध्यक्ष व इतर सदस्यांना प्रवास व दैनिक भत्ते खर्च	१,००,०००/-
३.	कार्याध्यक्षांना मानधन	७०,०००/-
४.	बैठकीच्या वेळी अल्पपोहार/चहा/कॉफी	१,००,०००/-
५.	अकादमी कार्यालयातील दुरुस्ती/वातानुकूलित यंत्र बसविणे/रंगरंगोटी करणे	२,००,०००/-
६.	उर्दू अकादमीच्या विविध योजनांची उर्दू वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देवून अर्ज मागविणे	१,००,०००/-
	(अक्षरी रुपये सहा लाख सत्तर हजार फक्त)	६,७०,०००/-

२. सदरहू रक्कम "मागणी क्र. झेडई १,२२०५ कला व संस्कृती, १०२-कला व संस्कृती प्रचालन (००) (०१) उर्दू अकादमीची आस्थापना/दत्तमत, ३१ सहाय्यक अनुदान अनिवार्य (२२०५ ३०२७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यास यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याच्या संगणक संकेताक २०१९०६१२१७२११४७४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.06.12 17:05:33 +05'30'

(सं.छ.तडवी)

सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर ,
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. सह सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,(का-७/(का-५)/(का-२) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अधिक्षक-नि- कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.
७. निवड नस्ती (महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.)